धनगर व वंजारी समाजाचा अंतर्भाव केल्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचे वाढविलेले ६ टक्के आरक्षण सर्व बाबींकरीता लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-बीसीसी-१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/सोळा-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २१/६/१९९३.

पहा:- १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०६४/प्र.क्र.१११/जे, दिनांक १ एप्रिल, १९६५.

२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०७०/इसीआर-जे, दिनांक २३ नोव्हेंबर, १९७०

३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०७२/जे, दिनांक २३ मे, १९७४.

४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/सोळा-ब, दिनांक ४ ऑगस्ट, १९९२.

शासन निर्णय:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी/१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/१६-ब, दिनांक ४ ऑगस्ट, १९९२ अन्वये विमुक्त जाती व भटक्या जमातीकरीता पदोन्नती व सरळ सेवा भरतीकरीता असलेले ४ टक्क्याचे आरक्षण ६ टक्के करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. याच निर्णयातील परिच्छेद २ मध्ये मागासवर्गीयांच्या विविध गटासाठी असलेल्या आरक्षणाची टक्केवारी दर्शविण्यात आलेली आहे. व त्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीकरीता ६ टक्के आरक्षण दर्शविण्यात आले आहे. तथापि, पदोन्नती व सरळ सेवा भरती या शब्द रचनेमुळे वर उल्लेखिलेले आरक्षण इतर प्रयोजनाकरीता लागू आहे किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. म्हणून त्या संदर्भात आता असे स्पष्ट करण्यात येते की, विमुक्त जाती व भटक्या जमातीकरीता पूर्वी ज्या ज्या प्रयोजनाकरीता ४ टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते त्या सर्व प्रयोजनाकरीता वाढीव २ टक्के आरक्षण लागू राहील.

२. हे आदेश पूर्वलक्षीप्रभावाने म्हणजेच दिनांक ४ ऑगस्ट, १९९२ पासून लागू होतील.

[कृ.मा.प.]

३. मंत्रालयातील विविध विभागांनी याची नोंद घेऊन याबाबत त्या त्या विभागानी योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

अ. तु. वाघमारे

[अ. तु. वाघमारे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, आदिवासी विकास विभाग, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी [एकात्मिक आदिवासी प्रकल्प]
सर्व आदिवासी कल्याण,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग/कार्यालय प्रमुख.

* पत्राने.